# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

## UG- 11.13 द्वितीय सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।

उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः स्कन्धः
अथ त्रयोदशोऽध्याय:

श्रीभगवानुवाच
सत्त्वं(म्) रजस्तम इति , गुणा बुद्धेर्न चात्मनः ।
सत्त्वेनान्यतमौ हन्यात् , सत्त्वं(म्) सत्त्वेन चैव हि ॥ 1॥

भगवान श्रीकृष्ण म्हणतात -सत्व ,रज आणि तमक हे तीन बुद्धीचे गुण आहेत, आत्म्याचे नव्हे त .सत्वगुडाने रज आणि तमाशा नाश करावा .नंतर शुद्ध सत्वाने वृत्ती रूप सत्वगुणाचाही त्याग करावा।

सत्त्वाद् धर्मो भवेद् वृद्धात्, पुं(म्)सो मद्भक्तिलक्षणः ।

सात्त्विकोपासया सत्त्वं(न्), ततो धर्मः(फ्) प्रवर्तते ॥ 2॥

माणसाचा सत्वगुण वाढला असता माझ्या भक्ती रूप धर्माची वाढ होते .सात्विक पदार्थांचे सेवन केले असता सत्व गुण वाढतो आणि त्यामुळे धर्माकडे प्रवृत्ती होते.

धर्मो रजस्तमो हन्यात्, सत्त्ववृद्धिरनुत्तमः ।

आशु नश्यति तन्मूलो, ह्यधर्म उभये हते ॥ 3॥

सत्वगुणाची वाढ हाच श्रेष्ठ धर्म होय. रज आणि तम नष्ट झाले असता त्यांच्यामुळे उत्पन्न होणारा अधर्म सुद्धा ताबडतोब नष्ट होतो.

आगमोऽपः(फ्) प्रजा देशः(ख्), कालः(ख्) कर्म च जन्म च ।

ध्यानं(म्) मन्त्रोऽथ सं(म्)स्कारो, दशैते गुणहेतवः ॥ 4॥

शास्त्र ,पाणी ,प्रजा ,देश ,काळ ,कर्म ,जन्म ,ध्यान ,मंत्र आणि संस्कार ही दहा गुणांच्या वाढीची कारणे आहेत.

तत्तत्सात्त्विकमेवैषां(यँ), यद् यद् वृद्धाः(फ्) प्रचक्षते ।

निन्दन्ति तामसं(न्) तत्तद्, राजसं(न्) तदुपेक्षितम् ॥ 5॥

श्रेष्ठ लोक ज्यांची प्रशंसा करतात ,ते सात्विक समजावेत ,ज्यांची उपेक्षा करतात ते राजस आणि ज्यांची निंदा करतात ते कामच समजावे त .

सात्त्विकान्येव सेवेत, पुमान् सत्त्वविवृद्धये ।

ततो धर्मस्ततो ज्ञानं(यँ), यावत् स्मृतिरपोहनम् ॥ 6॥

माणसाने सत्वगुणाच्या वृद्धीसाठी सात्विक पदार्थांचे सेवन करावे .त्यामुळे धर्म वाढून ज्ञान उत्पन्न होईल आणि अज्ञानामुळे आत्मसाक्षात्कार होऊन सर्व प्रकारचे संशय नाहीसे होतील.

वेणुसङ्घर्षजो वह्निर्- दग्ध्वा शाम्यति तद्वनम् ।

एवं(ङ्) गुणव्यत्ययजो, देहः(श्) शाम्यति तत्क्रियः ॥ 7॥

बांबूंच्या एकमेकांवर घासण्याने उत्पन्न झालेला अग्नी जसा बांबूंचे वन जाळून स्वतः शांत होतो, त्याचप्रमाणे गुणांच्या मिश्रणाने उत्पन्न झालेले देह ,सत्वगुणापासून उत्पन्न झालेल्या ज्ञानाग्नीने भस्म होतात.

उद्धव उवाच

विदन्ति मर्त्याः(फ्) प्रायेण, विषयान् पदमापदाम् ।

तथापि भुञ्जते कृष्ण, तत् कथं(म्) श्वखराजवत् ॥ 8॥

उद्धव आणि विचारले - भगवन !साधारणतः सर्वच माणसांना हे माहित आहे की, विषय हे संकटांचे घर आहे .तरीसुद्धा ती माणसे कुत्री ,गाढवे किंवा बोकडांप्रमाणे ते विषय का भोगतात ?

श्रीभगवानुवाच

अहमित्यन्यथाबुद्धिः(फ्), प्रमत्तस्य यथा हृदि ।

उत्सर्पति रजो घोरं(न्), ततो वैकारिकं(म्) मनः ॥ 9॥

श्रीकृष्ण म्हणाले - अज्ञानी माणसाच्या मनामध्ये देहाविषयी ' मी ' अशी खोटी कल्पना उत्पन्न होते ,तेव्हा त्याच्या सत्वगुण प्रधान मनात घोर रजोगुण उत्पन्न होतो.

रजोयुक्तस्य मनसः(स्), सं(ङ्)कल्पः(स्) सविकल्पकः ।

ततः(ख्) कामो गुणध्यानाद्, दुःसहः(स्) स्याद्धि दुर्मतेः ॥10॥

करोति कामवशगः(ख्), कर्माण्यविजितेन्द्रियः ।

दुःखोदर्काणि सम्पश्यन्, रजोवेगविमोहितः ॥ 11॥

रजो गुणाने घेरलेले मन अनेक प्रकारचे संकल्प विकल्प करू लागते .नंतर त्याच त्याच विषयांचे चिंतन केल्यामुळे त्याच्याविषयी असहय अशी कामना उत्पन्न होते . त्या कामनांच्या अधीन झालेला व मन ताब्यात नसलेला मनुष्य कळून सवरून परिणामी दुःखदायक अशीही कामे करतो .कारण तो रज गुणाच्या आवेगाने अतिशय मोहित झालेला असतो.

रजस्तमोभ्यां(यँ) यदपि, विद्वान् विक्षिप्तधीः(फ्) पुनः ।

अतन्द्रितो मनो युं(ञ्)जन्, दोषदृष्टिर्न सज्जते ॥ 12॥

रजो गुण तमो गुणांनी ज्ञानी माणसाची सुद्धा बुद्धी विषयांकडे धाव घे ते .परंतु तो सावधगिरी बाळगून मन एकाग्र करून विषय दोषयुक्त आहेत ,हे जाणून त्यामध्ये आसक्त होत नाही.

अप्रमत्तोऽनुयुं(ञ्)जीत, मनो मय्यर्पयञ्छनैः ।

अनिर्विण्णो यथाकालं(ञ्), जितश्वासो जितासनः ॥ 13॥

म्हणून साधकाने त्रिकाळ सावधपणे उत्साह पूर्वक आसन व प्राण यांवर विजय मिळवून क्रमाक्रमाने मन वारंवार माझ्या ठिकाणी लावावे.

एतावान् योग आदिष्टो, मच्छिष्यैः(स्) सनकादिभिः ।

सर्वतो मन आकृष्य, मय्यद्धाऽऽवेश्यते यथा ॥ 14॥

सर्व विषयांपासून मनाला बाजूला करून ते प्रत्यक्ष माझ्यामध्येच स्थिर करावे .माझे शिष्य असणाऱ्या सनकाधिकांनी योगाचे हेच स्वरूप सांगितले आहे.

उद्धव उवाच

यदा त्वं(म्) सनकादिभ्यो, येन रूपेण केशव ।

योगमादिष्टवानेतद्, रूपमिच्छामि वेदितुम् ॥ 15॥

उद्धवाने विचारले -हे केशवा !हा योग आपण सनकाधिकांना ज्यावेळी ज्या रुपाने उपदेश ला होता ,ते रूप मी जाणून घेऊ इच्छितो.

श्रीभगवानुवाच

पुत्रा हिरण्यगर्भस्य, मानसाः(स्) सनकादयः ।

पप्रच्छुः(फ्) पितरं(म्) सूक्ष्मां(यँ), योगस्यैकान्तिकीं(ङ्) गतिम् ॥ 16॥

श्री भगवान म्हणाले _ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सनकाधीकांनी एकदा आपल्या वडिलांना योगाची सूक्ष्म आणि अंतिम मर्यादा विचारली होती.

सनकादय ऊचुः

गुणेष्वाविशते चेतो, गुणाश्चेतसि च प्रभो ।

कथमन्योन्यसं(न्)त्यागो, मुमुक्षोरतितितीर्षोः ॥ 17॥

सनकादींनीविचारले -तात !हे चित्त स्वभावतःचविषयांचे ठिकाणी आसक्त राहते आणि ते विषय वासना रूपाने चित्तात राहतात .तर मग या संसार सागरातून तरुण जाऊ इच्छिणाऱ्या मुमुक्षु नेत्यांना एकमेकांपासून दूर कसे ठेवावे ?

श्रीभगवानुवाच

एवं(म्) पृष्टो महादेवः(स्), स्वयं(म्)भूर्भूतभावनः ।

ध्यायमानः(फ्) प्रश्नबीजं(न्), नाभ्यपद्यत कर्मधीः ॥ 18॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले -भुतांना उत्पन्न करणाऱ्या श्रेष्ठ स्वयंभू ब्रह्मदेवाला सनक इत्यादींनी असा प्रश्न केला होता. परंतु त्याची बुद्धी कर्मांच्या ठिकाणी आसक्त असल्याकारणाने पुष्कळ विचार करू नये त्याला प्रश्नाचा आशय कळला नाही.

स मामचिन्तयद् देवः(फ्), प्रश्नपारतितीर्षया ।

तस्याहं(म्) हं(म्)सरूपेण, सकाशमगमं(न्) तदा ॥ 19॥

प्रश्नाचे उत्तर समजून घेण्यासाठी ब्रह्मदेवाने माझे स्मरण केले. तेव्हा मी हाऊस रूपाने त्याच्यासमोर प्रगट झालो.

दृष्ट्वा मां(न्) त उपव्रज्य, कृत्वा पादाभिवन्दनम् ।

ब्रह्माणमग्रतः(ख्) कृत्वा, पप्रच्छुः(ख्) को भवानिति ॥ 20॥

इत्यहं(म्) मुनिभिः(फ्) पृष्टस्- तत्त्वजिज्ञासुभिस्तदा ।

यदवोचमहं(न्) तेभ्यस्- तदुद्धव निबोध मे ॥ 21॥

तेव्हा मला पाहून सनकादिक ब्रह्मदेवाला पुढे करून माझ्याजवळ आले .त्यांनी मला प्रणाम केला आणि विचारले की , "आपण कोण आहात ? " हे उद्धवा ! तत्व जाणून घेण्यासाठीच आलेल्या मुलींनी मला असे विचारले ,तेव्हा मी त्यांना जे सांगितले ते ऐक.

वस्तुनो यद्यनानात्व- मात्मनः(फ्) प्रश्न ईदृशः ।

कथं(ङ्) घटेत वो विप्रा, वक्तुर्वा मे क आश्रयः ॥ 22॥

हे विप्रवर !जर आत्म्याबद्दल आपला हा प्रश्न असेल तर ,आत्मा रूप वस्तू एकच आहे .मग तुमचा हा प्रश्न कसा योग्य आहे ?बरे !उत्तर देण्यासाठी जर मी बोलू लागलो ,तर निर्विशेष आत्म्याविषयी कशाचा आधार घेऊन बोलू ?

पं(ञ्)चात्मकेषु भूतेषु , समानेषु च वस्तुतः ।

को भवानिति वः(फ्) प्रश्नो, वाचारम्भो ह्यनर्थकः ॥ 23॥

वास्तविक पंचमहाभूतात्मक तत्वे सर्व प्राण्यांमध्ये सारखीच आहेत. म्हणून 'आपण कोण ? 'हा आपला प्रश्न म्हणजे फक्त शब्द आहेत .तत्वतः त्याला काहीही अर्थ नाही.

मनसा वचसा दृष्ट्या, गृह्यतेऽन्यैरपीन्द्रियैः ।

अहमेव न मत्तोऽन्य- दिति बुध्यध्वमं(ञ्)जसा ॥ 24॥

मनाने ,वाणीने 'दृष्टीने किंवा अन्य इंद्रियांनी जे काही घेतले जाते ते सर्व "मीच आहे, माझ्याशिवाय दुसरे काहीच नाही . " हे तुम्ही निश्चित समजा.

गुणेष्वाविशते चेतो, गुणाश्चेतसि च प्रजाः ।

जीवस्य देह उभयं(ङ्), गुणाश्चेतो मदात्मनः ॥ 25॥

हे पुत्रांनो !चित्त विषयाकार होते आणि विषय चित्तात वासना रूपाने राहतात .परंतु विषय आणि चित्त हे दोन्ही माझेच स्वरूप असणाऱ्या जीवाचे देह आहेत.

गुणेषु चाविशच्चित्त- मभीक्ष्णं(ङ्) गुणसेवया ।

गुणाश्च चित्तप्रभवा, मद्रूप उभयं(न्) त्यजेत् ॥ 26॥

नेहमी विषयांचे सेवन करीत राहिल्याने चित्त त्या विषयांमध्ये प्रवेश करते आणि हे विषय चित्तातूनच निर्माण होतात .म्हणून साधकाने मद्रुप होऊन या दोन्हींचा ही त्याग करावा.

जाग्रत् स्वप्नः(स्) सुषुप्तं(ञ्) च, गुणतो बुद्धिवृत्तयः ।

तासां(व्ँ) विलक्षणो जीवः(स्), साक्षित्वेन विनिश्चितः ॥ 27॥

जागृती ,स्वप्न आणि सुशक्ती या क्रमाने सात्विक ,राजसह आणि तामस गुणांपासून बनलेल्या बुद्धीच्या वृत्ती आहेत .जीव या सर्वांचा साक्षी आहे ,असा शास्त्रांचा सिद्धांत आहे.

यर्हि सं(म्)सृतिबन्धोऽय- मात्मनो गुणवृत्तिदः ।

मयि तुर्ये स्थितो जह्यात्, त्यागस्तद् गुणचेतसाम् ॥ 28॥

ज्या अर्थी हे बुद्धीमुळे उत्पन्न झालेले बंधन आत्म्याला तिन्ही अवस्थांत बांधून टाकते 'म्हणून साधकाने तुरीय अवस्था स्वरूप माझ्या मध्ये राहून बुद्धीचे बंधन तोडावे .त्यामुळे विषय वचित्त या दोन्हींचाही परस्पर संबंध तुटतो.

अहं(ङ्)कारकृतं(म्) बन्ध- मात्मनोऽर्थविपर्ययम् ।

विद्वान् निर्विद्य सं(म्)सार- चिन्तां(न्) तुर्ये स्थितस्त्यजेत् ॥ 29॥

" मी, माझे " एक मिनिट या अहंकारानेच बंधन निर्माण होते. त्याच्यामुळेच आत्म्याच्या वास्तविक सच्चिदानंद रूपाचा लोप होतो .म्हणून हे जाणणार्यांने विरक्त होऊन विषयांची चिंता सोडून तुरीय अवस्थेतच असावे.

यावन्नानार्थधीः(फ्) पुं(म्)सो, न निवर्तेत युक्तिभिः ।

जागर्त्यपि स्वपन्नज्ञः(स्), स्वप्ने जागरणं(यँ) यथा ॥ 30॥

मनुष्य जोपर्यंत हा अनेकत्वाचा भ्रम युक्ती युक्तीने नाहीसा करीत नाही ,तोपर्यंत तो जागृत असूनही अज्ञान निद्रेत झोपलेला समजावा .त्याचे हे जागेपण स्वप्नातल्या जागेपणासारखेच मिथ्या होय.

असत्त्वादात्मनोऽन्येषां(म्), भावानां(न्) तत्कृता भिदा ।

गतयो हेतवश्चास्य, मृषा स्वप्नदृशो यथा ॥ 31॥

वास्तविक या विश्वात आत्म्याव्यतिरिक्त अन्य कोणतीही देहादीक वस्तू सत्य नाही. म्हणून स्वप्न पाहणाऱ्यांच्या सर्व क्रिया जशा खोट्या असतात ,त्याप्रमाणे अज्ञानी माणसाचे सुद्धा खोट्या देहाच्या आश्रयाने असणारे वर्णाश्रमधर्म ,त्यामुळे मिळणाऱ्या सर्व आधी गती आणि त्यांना कारण असणारी कर्मे हे सर्व खोटेच आहे.

यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणोऽर्थान्,

भुङ्क्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान् ।

स्वप्ने सुषुप्त उपसं(म्)हरते स एकः(स्),

स्मृत्यन्वयात्त्रिगुणवृत्तिदृगिन्द्रियेशः ॥ 32॥

जो बाल्य , तारुण्य इत्यादी अवस्थांच्या रुपाने वारंवार बदलणाऱ्या देहादीपदार्थांना आपल्या इंद्रियांनी जागृत अवस्थेत उपभोगतो ,तोच स्वप्नावस्थेत त्यांसारख्याच वासनामय पदार्थांचा मनाने उपभोग घेतो आणि गाढनिद्रेच्या वेळी तोच हे सर्व विषय आवरून ठेवतो .अशाप्रकारे या तीनही अवस्थांचा अनुभव घेणारा साक्षी इंद्रियांचा स्वामी ,चेतना आत्मा एकच आहे . " ज्याने स्वप्न पाहिले 'जो गाढ झोपला होता ,तोच मी जागा आहे , " या प्रत्याभिज्ञेवरून आत्म्याची एकता सिद्ध होते.

एवं(वँ) विमृश्य गुणतो मनसस्त्र्यवस्था,

मन्मायया मयि कृता इति निश्चितार्थाः ।

सं(ञ्)छिद्य हार्दमनुमानसदुक्तितीक्ष्ण-

ज्ञानासिना भजत माखिलसं(म्)शयाधिम् ॥ 33॥

मनाच्या या तीन अवस्था गुणांमुळे च झाल्या असून हे माझ्या पगडा असलेल्या मायेमुळेच माझ्यामध्ये कल्पिला गेलेल्या आहेत ,असा निश्चय करा . नंतर सगळ्या संशयांचा आधार असलेल्या अहंकाराला अनुमान प्रमाण व संतांचे उपदेश यांपासून उत्पन्न झालेल्या तीक्ष्ण ज्ञानरूपी खडगाने छिन्नविछिन्न करा व आपल्याच ह्रदयात स्थित असलेल्या माझे परमात्म्याचे भजन करा.

ईक्षेत विभ्रममिदं(म्) मनसो विलासं(न्),

दृष्टं(वँ) विनष्टमतिलोलमलातचक्रम् ।

विज्ञानमेकमुरुधेव विभाति माया,

स्वप्नस्त्रिधा गुणविसर्गकृतो विकल्पः ॥ 34॥

हे जग, हा मनाचाच खेळ आहे ,भास आहे . अलात चक्रासारखे हे अतिशय चंचल आहे .हे दिसणारे असल्यामुळे नाशवंत आहे ,या दृष्टीने याच्याकडे पहावे .विज्ञान म्हणजे एक परमात्माच जणू अनेक रूप आणि प्रकाशित झाल्यासारखा दिसतो .गुणांचे कार्य म्हणून जो हा तीन प्रकारचा भेद दिसतो, ती त्याची माया असल्यामुळे स्वप्नाप्रमाणे खोटी आहे.

*दृष्टिं(न्) ततः(फ्) प्रतिनिवर्त्य निवृत्ततृष्ण-

स्तूष्णीं(म्) भवेन्निजसुखानुभवो निरीहः ।

संदृश्यते क्व च यदीदमवस्तुबुद्ध्या,

त्यक्तं(म्) भ्रमाय न भवेत् स्मृतिरानिपातात् ॥ 35॥

म्हणून साधकाने हे जग नजरे आड करून सर्व इच्छा सोडून काहीही न करता स्वस्थ रहावे आणि आत्मा आनंदात मग्न असावे .व्यवहारासाठी कधी काही दिसले तरी हे खरे नाही ,असा निश्चय करून ते सोडून दिलेले असल्यामुळे भ्रम निर्माण होणार नाही .शरीर असेपर्यंत फक्त स्मरणरुप संस्कार राहील.

देहं(ञ्) च नश्वरमवस्थितमुत्थितं(वँ) वा,

सिद्धो न पश्यति यतोऽध्यगमत् स्वरूपम् ।

दैवादपेतमुत दैववशादुपेतं(वँ),

वासो यथा परिकृतं(म्) मदिरामदान्धः ॥ 36।।

मधी रेने धुंद झालेल्या माणसाला आपल्या अंगावरील वस्त्रांची शुद्ध असत नाही , त्याप्रमाणे आत्मज्ञान झालेल्या सिद्धाला हा नश्वर देह बसला आहे की उभा आहे ,दैवयोगाने तो कोठे गेला की आला आहे हेही माहीत नसते.

देहोऽपि दैववशगः(ख्) खलु कर्म यावत्,

स्वारम्भकं(म्) प्रतिसमीक्षत एव सासुः ।

तं(म्) स प्रपञ्चमधिरूढसमाधियोगः(स्),

स्वाप्नं(म्) पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ 37॥

प्राण्यांसह देह सुद्धा प्रारब्धाच्या अधीन असल्याकारणाने जोपर्यंत तो प्राप्त करून देणारे कर्म शिल्लक आहे ,तोपर्यंत तो पडण्याची वाट पाहत असतो .समाधीमध्ये स्थिर असलेला आत्मसाक्षात्कारी प्रपंचासह या देहाचा पुन्हा स्वीकार करीत नाही. स्वप्नातून जागा झालेला जसा स्वप्नातील गोष्टींचा स्वीकार करीत नाही तसाच.

मयैतदुक्तं(वँ) वो विप्रा, गुह्यं(यँ) यत् सां(ङ्)ख्ययोगयोः ।

जानीत माऽऽगतं(यँ) यज्ञं(यँ), युष्मद्धर्मविवक्षया ॥ 38॥

हे ऋषींनो !संख्या आणि योग या शास्त्रांमध्ये जे गुप्त ज्ञान सांगितले आहे ,तेच मी तुम्हाला सांगितले .मी यज्ञ स्वरूप भगवान स्वतःच तुम्हाला तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्यासाठी हंसरूपाने आलो आहे, असे समजा.

अहं(यँ) योगस्य सां(ङ्)ख्यस्य, सत्यस्यर्तस्य तेजसः ।

परायणं(न्) द्विजश्रेष्ठाः(श्), श्रियः(ख्) कीर्तेर्दमस्य च ॥ 39॥

हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो !योग ' सांख्य 'सत्य , ऋत ,तेज ,श्री ,कीर्ती आणि इंद्रिय निग्रह या सर्वांचे आश्रयस्थान मीच आहे.

मां(म्) भजन्ति गुणाः(स्) सर्वे, निर्गुणं(न्) निरपेक्षकम् ।

सुहृदं(म्) प्रियमात्मानं(म्), साम्यासं(ङ्)गादयोगुणाः ॥ 40॥

समता ,अनासक्ती इत्यादी जे अविनाशी गुण आहेत ,ते सर्व निर्गुण ,निरपेक्ष, सर्वांचा सु ऱ्हद ,सर्वांचा प्रिय आत्मा अशा माझ्या ठिकाणी सदैववास करतात.

इति मे छिन्नसन्देहा, मुनयः(स्) सनकादयः ।

सभाजयित्वा परया, भक्त्यागृणत सं(म्)स्तवैः ॥ 41॥

या माझ्या उपदेशाने सनका दी मुनींचा संदेह दूर झाला .ते माझी पूजा करून अत्यंत भक्ती भावाने ते माझी स्तुती करू लागले.

तैरहं(म्) पूजितः(स्) सम्यक्, सं(म्)स्तुतः(फ्) परमर्षिभिः ।

प्रत्येयाय स्वकं(न्) धाम, पश्यतः(फ्) परमेष्ठिनः ॥ 42॥

त्या श्रेष्ठ ऋषींनी माझी यथा संग पूजा करून स्तुती केली .नंतर ब्रह्मदेवांच्या देखतच मी आपल्या धामाकडे निघून गेलो.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायां एकादशस्कन्धे त्रयोदशोऽध्यायः

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

